**विशेष दिवाणी दावा क्र. १२९/२०११**

**CNR No. MHSO060004602011**

कमलाकर साळुंखे (मयत) वारस वगैरे

वि.

बाबुराव जवळेकर वगैरे

## आदेश निशाणी क्र. १४९ वर

०१. दिनांक १६/१२/२००१ रोजीचे अनोंदणीकृत साठेखताच्या आधारे खरेदीखत होवून मिळणेसाठी हा दावा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच सदर दावा मुदतीत नाही. त्यामुळे वादी यांना कोणताही अधिकार प्राप्त झालेला नाही. वादी यांनी बोगस साठेखताचा दस्त तयार केला आहे याबाबत प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे विरुध्द पंढरपूर येथील मा. न्यायदंडाधिकारी, वर्ग–१, पंढरपूर यांचे न्यायालयात नियमित फौजदारी खटला क्र. १७९/२००३ हा दाखल केला आहे. सदर साठेखताचा दस्त हा अपु–या स्टॅम्पवर लिहिलेला आहे. त्या साठेखताच्या दस्ता आधारे दावा मिळकतचा कब्जा दिला असेल तर रजिस्टेशन ॲक्ट मधील तरतुदींप्रमाणे तो दस्त नोंदणीकृत असणे आणि त्यावर संपुर्ण स्टॅम्प देणे बंधनकारक आहे. या सर्व कारणांवरुन दावा फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र. ४ यांनी या अर्जाद्वारे केलेली आहे.

०२. त्यावर वादी यांनी आक्षेप नोंदवला आहे. यापुर्वी निशाणी क्र. १३१ प्रमाणे अशाच मजकुराचा अर्ज प्रतिवादी यांनी दिलेला आहे. प्रतिवादी यांनी मा. ना. उच्च न्यायालय यांचेकडे केलेले प्रकरण नामंजूर झालेले आहे. प्रस्तुत दावा मुदतीत आहे काय या संबंधी स्वतंत्र मुद्दा निशाणी क्र. ९९ प्रमाणे निश्चित करण्यात आलेला आहे. केवळ प्रकरण लांबवण्यासाठी हा अर्ज दिलेला आहे. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा असे वादी यांनी नमूद केले.

०३. दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ७ रुल ११(ड) प्रमाणे जर दाव्यातील कथनाप्रमाणे नमूद दावा दाखल करण्यास कायद्याप्रमाणे प्रतिबंधीत केले असेल तर पुढील कोणतीही चौकशी न करता दावा नामंजूर करण्यात यावा अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

०४. प्रस्तुत दावा हा सन २०११ मध्ये दाखल करण्यात आलेला आहे. त्यामध्ये माझे पुर्वीचे मा. पिठासीन अधिकारी यांनी निशाणी क्र. ९९ प्रमाणे वादमुद्दे दिनांक २४/०२/२०१५ रोजी निश्चित केलेले आहेत. तसेच वादी यांनी उदयसिंह वादी यांचे साक्षीदार क्र. १ यांचे सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दिनांक ११/१२/२०१७ रोजी दाखल केलेले आहे.

०५. या प्रकरणात अगोदर देखील नमूद प्रतिवादी यांनी निशाणी क्र. १३१ व निशाणी क्र. १४५ प्रमाणे प्रकरण काढून टाकण्यासाठी अर्ज दिलेले आहेत. ते अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. सदर विवाद्य साठेखताचा दस्त बेकायदेशीर आहे असे प्रतिवादी यांचे कथन आहे. सदर बाब प्रतिवादी यांना वादी यांची उलटतपासणी करुन तसेच स्वतंत्र साक्षीपुरावा देऊन न्यायालयासमोर स्पष्ट करता येईल. प्रस्तुत दावा मुदतीत आहे किंवा नाही याबाबतचा मुद्दा निश्चित केलेला आहे. त्यामुळे प्रकरणात उभय पक्षकार यांना पुर्ण संधी देऊन गुणदोषावर योग्य निर्णय न करता तांत्रीक बाबींचा उहापोह करुन त्याबाबत आताच कोणताही निर्णय घेणे हे यावेळी Premature ठरेल. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## **आ दे श**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

दि. १३/१०/२०२१

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 13/10/2021 |
| Order uploaded on | : | 14/10/2021 |